Toppersnotes®
Unleash the topper in you

# MPSC

## राज्यसेवा पूर्व एवं मुख्य परीक्षा

## महाराष्ट्र लोक सेवा आयोग

## सामान्य अध्ययन

## मराठी (अनिवार्य)

SIERRA INNOVATIONS

# Maharastra - PSC

## मराठी (अनिवार्य)


| क्र.सं. | अध्याय | पृष्ठ सं. |
|---|---|---|
| 1. | मराठी भाषेचा उगम, वर्णविचार | 1 |
| 2. | संधी | 19 |
| 3. | शब्दांच्या जाती | 29 |
| 4. | नाम | 30 |
| 5. | सर्वनाम | 50 |
| 6. | विशेषण | 56 |
| 7. | क्रियापद | 63 |
| 8. | क्रियाविशेषण अव्यय | 70 |
| 9. | शब्दयोगी अव्यय | 74 |
| 10. | उभयान्वयी अव्यय | 76 |
| 11. | केवल प्रयोगी अव्यय | 87 |
| 12. | प्रयोगविचार | 89 |
| 13. | वाक्य प्रकार | 102 |
| 14. | समास | 114 |
| 15. | अलंकार | 123 |
| 16. | शब्द शक्ती | 129 |
| 17. | शब्द सिद्धी | 132 |
| 18. | समुह दर्शक शब्द | 133 |
| 19. | ध्वनीदर्शक शब्द | 135 |
| 20. | शब्दसमुहाबदद्ल एक शब्द | 137 |
| 21. | वाक्प्रचार | 155 |
| 22. | म्हणी व त्यांचे अर्थ | 196 |
| 23. | विरूद्धार्थी शब्द | 214 |
| 24. | समानार्थी शब्द | 224 |
| 25. | लेखन विभाग | 239 |

Toppersnotes
Unleash the topper in you

# मराठी भाषेचा उगम, वर्णविचार

भाषा हे संवादाचे एक प्रभावी साधन, माध्यम आहे. बोलणारा आणि ऐकणारा यांना जोडणारा पूल म्हणजे भाषा होय. आपले विचार, भावना, कल्पना, अर्थच्छटा नेमकेपणाने व्यक्त करण्यासाठी भाषेवरील प्रभुत्व आवश्यक असते. हे आपले बोलणे, आपले विचार करणे हे भाषेच्या माध्यमातूनच घडत असते. भाषेचे महत्व आपण लक्षात घेतले पाहिजे. भाषेमुळे आपले सर्व जीवनव्यवहार सुरळीत होत असतात. भाजी मंडईतील भाजी आणण्यापासून एखाद्या ग्रंथाच्या अभ्यासापर्यंत भाषा आपल्याला साथ करते. आयुष्यभर भाषा आपल्याला आपल्या विकासासाठी मदत करते. व्यक्तीच्या विकासाबरोबरच समाजाच्या विकासातही भाषेचे योगदान मोठे आहे. समाजाच्या विकासात मोठे विचारवंत, तत्त्वज्ञ, कवी, लेखक यांचा सहभाग असतो. त्यांचे विचार जतन करण्याचे काम भाषा करते. विविध लहानमोठी कामे करणारी माणसे समाजात असतात. अशा असंख्य माणसांच्या जडणघडणीत भाषेचे योगदान असते. आपली संस्कृती भाषेच्या-

Toppersnotes
Unleash the topper in you

माध्यमातून विकसीत होत असते.

शालेय अभ्यासात किंवा महाविद्यालयीन अभ्यासात विद्यार्थी अनेक विषयांचा अभ्यास करतात. गणित, विज्ञान, इतिहास, भूगोल, नागरिशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, तत्वज्ञान, जमाखर्च, पत्रव्यवहार, स्थापत्य शास्त्र, कायदा, न्यायव्यवस्था, औषधशास्त्र इत्यादी विषयांचा अभ्यास भाषेच्याच माध्यमातून आपण करतो. म्हणून भाषेचे महत्त्व लक्षात घेऊन त्या भाषेच्या अभ्यासाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

## मराठी भाषा उत्पत्ती विषयी

भारत हा महान देश असून विस्तीर्ण भू-प्रदेशाने व्यापलेला आहे. येथील संस्कृतीत विविधता आढळते तसेच अनेक बोलीभाषा येथे बोलल्या जातात. भारतातील भाषा या प्रमुख दोन गटात विभागलेल्या दिसतात.

**भारतीय भाषांचे गट**

- इंडो युरोपीय (इंडो-आर्य भाषा)
- द्राविडीयन भाषा

Toppersnotes
Unleash the topper in you

युरोप खंडातून आर्यांचे भारतात आगमन याविषयी अनेक मतमतांतरे असली तरी इंडो-आर्यन भाषागट हा सिद्धांत बऱ्यापैकी मान्यताप्राप्त आहे. हे आजपर्यंत विचारलेल्या प्रश्नावरून लक्षात येते. साधारणपणे महाराष्ट्रापासून उत्तरेकडे बोलल्या जाणाऱ्या भाषा या इंडो-आर्यन गटात मोडतात. कारण या भाषेतील शब्द हे आर्यन तसेच मूळ भारतीय शब्द या सारखे शब्द अशा दोन्ही प्रकारचे मिश्रण स्वरूपात आढळतात. दक्षिण भारतातील भाषा मात्र द्रविडीयन गटात मोडतात. भारतात असे दोन वेगवेगळे भाषिक गट असले तरी लिपीच्या बाबतीत मात्र ~~ब्राह्मी~~ ब्राह्मी लिपी ही भारतातील सर्व लिपीच्या उगमाचे कारण ठरलेली आहे.

महाराष्ट्राचा विचार केल्यास येथील बहुसंख्य लोकांची मातृभाषा मराठी आहे. ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांच्या 27 फेब्रुवारी हा जन्मदिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो, तर 1 मे हा मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा केला जातो. मराठी भाषेची लिपी देवनागरी आहे. देवनागरी लिपीचा उगम व विकासाबाबत अनेक मत-मतांतरे असली तरी-

लोकसेवा आयोगाने विचारलेले प्रश्न व दिलेली उत्तरे यानुसार या लिपीच्या उगमाचा थोडक्यात इतिहास खाली नमूद केला आहे.

काही महत्त्वाच्या प्राचीन लिपी :

खरोष्ठी व ब्राम्ही या भारतातील प्राचीन लिपी मानल्या जातात.

1) ब्राम्ही लिपी :

भारतातील एक अत्यंत प्राचीन व महत्त्वाची आर्य लिपी. या लिपीला भारतातील सर्व लिपींची जननी मानली जाते. साक्षात ब्रम्हदेवाने ही लिपी शोधली; म्हणून तिचे नाव ब्राम्ही लिपी पडले अशी विचारधारा आहे; परंतु याबाबत विद्वानांमध्ये मतभेद आहेत.

2) खरोष्ठी लिपी :

ही लिपी गान्धारी लिपी या नावाने-सुद्धा ओळखली जाते. गाढवाच्या ओठांच्या आकाराची म्हणून या लिपीला खरोष्ठी हे नाव पडले आहे. सामान्यपणे भारताचा वायव्य सीमावर्ती भाग तसेच अफगाणिस्तान या प्रदेशात कुषाण काळात भारतात या लिपीचा प्रामुख्याने उपयोग केला गेला. या लिपीचा प्रयोग तिसऱ्या शतकापर्यंत प्रामुख्याने आशिया खंडात केला गेला. बौद्ध उल्लेखात खरोष्ठी -

लिपीचा प्रामुख्याने उल्लेख सुरुवातीपासून येतो. या लिपीचा आर्य भारतीय लिपीशी काहीही संबंध नाही.

3) देवनागरी लिपी :

ब्राम्ही लिपीपासूनच देवनागरी लिपीचा विकास झाला आहे. आर्य स्वत:ला देव मानत. ते नगरातच राहत असत. यावरुन नगरात राहणाऱ्या देवांची लिपी ; म्हणून या लिपीला देवनागरी लिपी म्हणतात. देवनागरी लिपीला 'बाळबोध' लिपी असेसुद्धा नाव आहे. प्रत्येक ध्वनीला स्वतंत्र चिन्ह असल्याने देवनागरी लिपी परिपुर्ण लिपी मानतात. ही लिपी डावीकडून उजवीकडे लिहीली जाते, तसेच या लिपीच्या डोक्यावर जी आडवी रेषा असते तिला शिरोरेषा असे म्हणतात.

4) मोडी लिपी :

मराठी देवनागरी लिपी काही काळ मुरड घालुन लिहण्याची पद्धत होती, तिला 'मोडी लिपी' असे म्हणत. मोडी लिपीला धावलिपी असेसुद्धा म्हणतात.

* भाषा म्हणजे आपले विचार व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम.
* भाषा हा शब्द 'भाष' या संस्कृत धातूपासून तयार झालेला आहे. (भाष् - बोलणे)
* मराठी भाषेची लिपी देवनागरी लिपी आहे. तीलाच बाळबोध लीपी, मोडलिपी व धावालीपी असे म्हटले जाते.

भाषा - भाष्
लिंपणे - लिप्
लिखाण - लिख
} धातू

22 भाषा - राजभाषा आहेत.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती.

मराठी भाषेचा विकास → 'संस्कृत + प्राकृत'

* मराठी भाषेतील 1st पुरावा इ. स. 983 कर्नाटकातील श्री गोमटेश्वरांच्या (बाहुबली) पुतळ्याखाली 'श्री चावुण्डराजे करवियले' सप्तशती 2000 हा 1st ग्रंथ मानतात.

13 वे शतक
- मुकुंदराज - विवेकसिंधु, परमामृत, परम
- ज्ञानेश्वर - ज्ञानेश्वरी (भावार्थदिपिका), अमृतानुभव
- म्हाइंभट - लिळाचरीत्र
- केशवदेव व्यास - दृष्टांत पाठ
- भणिमाचार्य - पंचवार्तिक
- विल्यम केरी - The grammer of Maratha language 1805

1836 :- दादोबा पांडुरंग तर्खडकर - महाराष्ट्र भाषेचे व्याकरण (1836)

1836 :- गंगाधरशास्त्री फडके - मराठी महाराष्ट्र भाषेचे व्याकरण (1836)

1911 :- मोरो केशव दामले - शास्त्रीय मराठी व्याकरण (1911)

मराठी भाषेचे पाणिनी - दादोबा पांडुरंग तर्खडकर

मराठी भाषेचे शिवाजी - विष्णुशास्त्री चिपळूणकर

* वाच्यार्थ नियत सर्वे - मनू
सारे व्यवहार भाषेवरच अवलंबुन असतात.

Toppersnotes
Unleash the topper in you

# वर्णमाला

अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, लृ, ए, ऐ, ओ, औ
अं, अः । ॲ, ऑ

क, ख, ग, घ, ङ

च, छ, ज, झ, ञ

ट, ठ, ड, ढ, ण

त, थ, द, ध, न

प, फ, ब, भ, म

य, र, ल, व, श, ष, स, ह, ळ

* वर्ण - रंग
  अक्षर - नष्ट न होणारे
* अक्षरे या आपल्या ध्वनींच्या किंवा आवाजांच्या खुणा आहेत म्हणून त्यांना ध्वनी चिन्हे म्हणतात.

मुळ स्वर - 12 आधुनिक - 14
मुळ व्यंजन - 34 आधुनिक - 36
मुळ वर्णमाला - 48 वर्ण आधुनिक - 50

'क्ष' व 'ज्ञ' ही संयुक्त व्यंजने असल्याने त्यांचा बाराखडीत समावेश नाही

क्ष = क + ष ज्ञ = द + न + य

Toppersnotes
Unleash the topper in you

# वर्णांचे प्रकार

- स्वर
  - ऱ्हस्व स्वर (5): अ, आ, इ, उ, ऋ, लृ
  - दीर्घ स्वर (3): आ, ई, ऊ
  - संयुक्त स्वर (5): ए, ऐ, ओ, औ
- स्वरादी (2+2) [अं, अः] [अॅ, ऑ]
- व्यंजन स्वरान्त परवर्ण (34)
  - कठोर वर्ण (अघोष वर्ण / श्वास): क, ख; च, छ; ट, ठ; त, थ; प, फ
  - मृदू वर्ण (घोष वर्ण / नाद): ग, घ; ज, झ; ड, ढ; द, ध; ब, भ
  - अनुनासिक परसवर्ण: ङ, ञ, ण, न, म
  - अर्धस्वर: य → इ, र → उ, ल → ऋ, व → लृ
  - ऊष्मे (घर्षक): स, श, ष
  - महाप्राण (ह)
  - स्वतंत्र (ळ)

'ह' युक्त – महाप्राण (14)
'ह' नसणारे – अल्पप्राण (20)

उपवाद – स – s → महाप्राण
च – ch → अल्पप्राण

अर्धस्वर – संधी घेतांना
एकमेकांची जागा घेतांना

Toppersnotes Unleash the topper in you

* अर्ध्या / पाय मोडलेल्या अक्षरात स्वर नसतो
* अनुस्वाराऐवजी अनुनासिक आल्यास ते व्यंजनात मोजावे

क्ष, ज्ञ → जोडाक्षर आहेत.

कृपा, पृथ्वी → क + ऋ = कृ,
प + ऋ = पृ – जोडाक्षर नाही, स्वर आहे

धृतराष्ट्र ⇒ ध + ऋ + त + अ + र + आ + ष + ट + र + अ
मुलध्वनी = 10 स्वर = 4 व्यंजन = 6

कृष्णाष्टमी ⇒ क + ऋ + ष + ण + आ + ष + ट + अ + म + ई
मुलध्वनी = 10 स्वर = 4 व्यंजन = 6

लक्ष्मीनारायण ⇒ ल + अ + क + ष + म + इ + न + आ + र + आ + य + अ + ण + अ
व्यंजन ⇒ 8 स्वर = 6 मुलध्वनी = 14

चक्रवर्ती ⇒ च + अ + क + र + अ + व + अ + त + र + ई
मुलध्वनी = 10 स्वर = 4 व्यंजन = 6

कृतज्ञता ⇒ क + ऋ + त + अ + द + न + य + त + आ
व्यंजन = 6 स्वर = 3 मुलध्वनी = 9

क्षुत्पिपासा ⇒ क + ष + उ + प + त + इ + प + आ + स + आ
मुलध्वनी = 10 स्वर = 4 व्यंजन = 6

वृक्षौदार्य ⇒ व + ऋ + क + ष + औ + द + आ + य + र + अ

व्यंजन = 6 स्वर = 4 मुलध्वनी = 10

चक्रपाणी ⇒ च + अ + क + र + अ + प + आ + ण + ई

व्यंजन = 5 स्वर = 4 मुलध्वनी = 9

राष्ट्रपती ⇒ र + आ + ष + ट + र + अ + प + अ + त + इ

व्यंजन = 6 स्वर = 4 मुलध्वनी = 10

इश्वर ⇒ इ + श + व + अ + र + अ

व्यंजन = 3 स्वर = 3 मुलध्वनी = 6

Toppersnotes
Unleash the topper in you

स्वर - ओठांचा एकमेकांशी or जिभेचा कोणत्याही भागांशी स्पर्श न होता उच्चार होणाऱ्या ध्वनीला स्वर असे म्हटले जाते.

स्वराचे ३ प्रकार

- ऱ्हस्व स्वर
- दिर्घ स्वर
- संयुक्त स्वर

1) ऱ्हस्व स्वर →

ओखूड उच्चार होणाऱ्या स्वरांना ऱ्हस्व स्वर म्हणतात. (उच्चारण्यास कमी कालावधी लागतो.)

अ, इ, उ, ऋ          क् + ऋ = कृ

* यालाच सिद्ध स्वर असेही म्हणतात.

2) दिर्घ स्वर →

लांबट उच्चार होणाऱ्या स्वरांना दिर्घ स्वर म्हणतात. उच्चारण्यास दिर्घ / जास्त कालावधी लागतो.

आ, ई, ऊ

3) संयुक्त स्वर →

दोन स्वरांनी मिळून तयार झालेल्या स्वरांना संयुक्त स्वर म्हणतात.

ए = अ + इ / ई          ओ = अ + उ / ऊ

ऐ = आ + इ / ई          औ = आ + उ / ऊ

Toppersnotes Unleash the topper in you

1) सजातीय स्वर :

एकाच उच्चार स्थानापासून निघणाऱ्या स्वरांना सजातीय स्वर असे म्हणतात.

① अ - आ ② इ - ई ③ उ - ऊ

2) विजातीय स्वर :

भिन्न उच्चारस्थानातून निघणाऱ्या स्वरांना विजातीय स्वर म्हणतात.

अ - उ / ऊ अ - ई ऊ - इ / ई

संयुक्त स्वरांचा यात समावेश नाही.

* मात्रा :

स्वरांना उच्चारण्यास लागणाऱ्या कालावधीस मात्रा असे म्हणतात.

ऱ्हस्व स्वर → उच्चारण्यास एक मात्रा

दिर्घ स्वर → उच्चारण्यास दोन मात्रा

* स्वरादी ⇒ अं व अः उच्चार करताना [अनुस्वार (अं) व विसर्ग (अः)] स्वरांचा उच्चार आधी करावा लागतो म्हणून यांना स्वरादी म्हणतात.

ज्याच्या आधी स्वर आहे असा स्वरादी

नवे स्वरादी - ॲ / ऑ

Toppersnotes
Unleash the topper in you

# व्यंजन

## स्वरान्त / परवर्ण / व्यंजन

उच्चार होतांना जिभेचा टोकांनीही इतर अवयवांशी स्पर्श होतो. तसेच ते स्वरावर अवलंबून असल्याने त्यांना परवर्ण म्हणतात. तसेच (अंती) शेवटी स्वर आहे म्हणून स्वरान्त असे म्हणतात.

एकूण 38 व्यंजनं आहेत.

व्यंजनांत स्वर मिसळला की अक्षर बनते

व्यंजन + स्वर = अक्षर   क् + अ = क

### स्पर्श व्यंजने (25 व्यंजने + 12 स्वर)

| कठोर व्यंजने | मृदु व्यंजने |
|---|---|
| श्वास/अघोष (13) | नाद / घोष (35) |
| उच्चारास कठीण | मृदु/सौम्य उच्चार |
| क, ख, त, थ, च, छ, ट, ठ, प, फ, श, ष, स | ग, घ, ज, झ, ङ, ढ, द, ध, ब, भ, य, र, ल, व, ह, ळ, स्वर, अनुनासिके स्वरादी |

र - उच्चार करतांना कंपन होते म्हणून यास 'कंपित-वर्ण' असे म्हणतात.

* अनुनासिक / पर-सवर्ण ⇒

नाकातून उच्चार होणारे म्हणून यास अनुनासिक म्हणतात.

अनुनासिक स्वराऐवजी वापरता येतात म्हणून परसवर्ण म्हणतात. (सिंह - सिन्ह)

Toppersnotes
Unleash the topper in you

## स्पर्श व्यंजने + स्वर

**मृदुवर्ण / नाद / घोषवर्ण**

अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, लृ
ए, ऐ, ओ, औ, अं, अः
ग, घ, ज, झ, ड, ढ, द, ध,
ब, भ, य, र, ल, व, ह, ळ,
ङ, ञ, ण, न, म

**कठोरवर्ण / श्वास / अघोष वर्ण**

क, ख, च, छ, ट, ठ,
त, थ, प, फ, श, ष, स

ज्या अनुस्वारांबद्दल अनुनासिक वापरता येते त्यास स्पष्टोच्चारित अनुनासिक म्हणतात.

### * अर्धस्वर :

य, र, ल, व, यांची उच्चार स्थाने अनुक्रमे इ, ऋ, लृ, उ या यांच्यासारखीच येतात म्हणून त्यांना अर्धस्वर म्हणतात. (संधी होतांना एकमेकांची जागा घेतात.)

य, र, ल, व
↓ ↓ ↓ ↓
इ ऋ लृ उ

### * ऊष्मे घर्षक :

श, ष, स यांचा उच्चार करतांना ऊष्ण किंवा गरम हवा तोंडावाटे बाहेर पडल्यासारखा उच्चार होतो.

### * महाप्राण :

'ह' या वर्णाचा उच्चार करतांना फुफ्फुसातील हवा तोंडावाटे बाहेर टाकल्या सारखा उच्चार होतो म्हणून त्यास महाप्राण म्हणतात. एकुण 14 महाप्राण आ